## कलाभान

अभिजीत ताम्हणे



# बरवेंनंतरचं सज्ञानवर्ष

**चित्रकार प्रभाकर बरवे यांचा स्मृतिदिन गेल्या १७ वर्षांत फार कुणी साजरा केला नव्हता, पाळला नव्हता. पण यंदाचं वर्ष निराळं आहे. त्यांच्या स्मृतिदिनी यंदाही काही कार्यक्रम नसतील, पण बरवे यांचा चित्रविचार जगाला कळण्याची शक्यता दुणावली असल्याचं समाधान इतक्या वर्षांनी प्रथमच मिळत आहे. ते समाधान का आणि बरवे यांचा चित्रविचार म्हणजे काय, याबद्दलचा हा मजकूर…**

**६ डिसेंबर** ही तारीख कुणाला चैत्यभूमीसाठी आठवत असते तर कुणाला अयोध्येसाठी. या दोन्हीच्या पलीकडे, अगदी थोड्या जणांना ही तारीख प्रभाकर बरवे यांचा स्मृतिदिन म्हणून आठवते. बरवे हे महाराष्ट्रातले (आणि सर्वार्थानं महाराष्ट्रीय म्हणता येईल असे) महत्त्वाचे चित्रकार म्हणून १९८६ ते १९९५ या काळात सर्वपरिचित झालेले होते. त्यामुळे बरवे यांच्या मृत्यूची नेमकी तारीख (६ डिसेंबर १९९५) फार कुणाला लक्षात नसली, तरी पुष्कळ जणांना बरवे आठवत असतातच. बेंगळुरूत किंवा दिल्लीतही एखादा अभ्यासू चित्रकार, समोरचा माणूस महाराष्ट्रातून आलाय हे कळल्यावर विचारतो : अरे वो बरवेसाहब थे न मुंबई में... उनका कुछ कलेक्शन वगैरा अभी हैं किसी के पास? कहां देखने मिलेगा उनका काम?

बरवे यांच्याविषयीचं अभ्यासू कुतूहल कायम राखणाऱ्या या अमराठी प्रश्नांवर आपण मराठी माणसं आजवर निरुत्तर होत होतो. पण आता तसं होणार नाही.

याची कारणं दोन : एक- प्रभाकर बरवे यांनी लिहिलेलं 'कोरा कॅनव्हास' हे मराठीतल्या सर्वोत्कृष्ट १०० पुस्तकांपैकी एक मानलं जाणारं पुस्तक आता इंग्रजीत आलं आहे आणि बरवे यांना जे म्हणायचं होतं ते या पुस्तकात नीटसपणे (शांता गोखले यांचं भाषांतर आणि जेरी पिंटोकृत संपादन अशा दुहेरी संस्कारानिशी) मांडलं गेलं आहे. बरवेंची या पुस्तकातली रेखाचित्रं मराठीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे छापली गेली आहेत. इंग्रजी वाचणाऱ्या, चित्रकलेबद्दल नावड नसणाऱ्या (पण या कलेची फार माहिती नाही, अशासुद्धा) कुणालाही कळेल, भिडेल अशी सोपेपणाची पातळी या पुस्तकानं राखली आहे. मात्र, मराठी न समजणाऱ्या अभ्यासकांनाही बरवे यांचं कलागुज नेमकं काय होतं, हे समजून घेण्यासाठी आता इंग्रजीचा उपयोग होईल.

आणि दुसरं कारण : बरवे यांच्या मृत्यूनंतरचं सर्वांत मोठं प्रदर्शन सध्या मुंबईत भरलं असून ते पुढले तीन महिने- २८ फेब्रुवारी २०१४ पर्यंत सुरू राहणार आहे. लोअर परळच्या फिनिक्स मिलशेजारच्या रघुवंशी मिलचा पुनर्जन्म म्हणून जो काही अवतार झालाय, तिथल्या एका जागेत जरी हे प्रदर्शन भरलेलं असलं, तरी त्याचा दर्जा एखाद्या कलासंग्रहालयात उचित गांभीर्यानं मांडल्या गेलेल्या प्रदर्शनापेक्षा अजिबात कमी नाही. देशातले किंवा आंतरराष्ट्रीय कलाप्रेमी 'बरवे क्या चीज थी' याचं उत्तर मिळवण्यासाठी पुढल्या तीन महिन्यांत कधीही मुंबईत येऊ शकतात, ही स्वागतार्ह घडामोड ठरेल.





या मजकुराचं शीर्षक 'बरवेंनंतरचं सज्ञानवर्ष' असं यासाठी आहे की, बरवे यांच्या मृत्यूला आता १८ वर्षं होताहेत आणि १८ पूर्ण हे आपल्या देशात 'सज्ञान होण्याचं वय' मानलं जातं- कायदेशीरदृष्ट्या. तो कायदा बरवे यांच्या मृत्यूनंतरच्या वर्षांना लागू असण्याचं काहीही कारण नव्हतं. बरवे यांचं भारतीय चित्रकलेच्या स्वातंत्र्योत्तर प्रवासातलं योगदान काय आहे, बरवे यांच्या निकट संपर्कातून त्यांच्या विचारांच्या जवळ आलेले इनेगिने चित्रकार, बरवे यांच्यासारखाच विचार आपापल्या परीनं करणारे (पण हा विचार बरवे यांनी ज्यांच्या आधी केला, असे) काही चित्रकार आणि मग बरवे यांनी रेखाचित्रांतून आणि रंगचित्रांमधून मांडलेला दृश्यविचार पुढे नेऊ पाहणारे पुढल्या पिढीतले अनेक तरुण, अशी बरवे यांची प्रभावळ दाखवता येते. कलाक्षेत्रात अनुयायांनी नेत्याच्या पुढे जाण्याचा प्रयत्न केला नाही, तर कला गोठून राहते. तसं बरवे यांच्याबाबत झालं नाही, हेही खरं आहे. बरवे यांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करणारे, त्यात यशस्वी झालेले चित्रकार हे बरवे यांच्याशी आजही कसं नातं सांगतात, याची चर्चा त्यामुळे अधिक सखोलपणे होऊ शकते. गिरीश शहाणे यांनी हा वारसा दाखवणाऱ्या एका प्रदर्शनाचं विचारनियोजन दिल्लीच्या एका गॅलरीसाठी काही वर्षांपूर्वी केलं होतं. त्याहीपेक्षा अधिक विस्तृत आढावा अभिजीत गोंडकर यांनी मुंबईतल्या ताओ आर्ट गॅलरीसाठी आणखी मोठ्या प्रदर्शनातून घेतला होता, त्यात बरवे-विचार मानणाऱ्या अनेकांच्या चित्रांसोबत स्वतः बरवे यांचीही तीन-चार चित्रं होती. मात्र, बरवे यांचा वारसा- त्यांची 'लीगसी'- फक्त मराठी भाषकांपुरती राहते आहे की काय, अशी शंका अधूनमधून येत राहिली. मध्यंतरी सतीश नाईक यांच्या 'चिन्ह' कलावार्षिकानं प्रभाकर बरवे यांच्या डायऱ्या अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचाव्यात असा प्रयत्न केला. त्याला अल्प यश आल्यावर मग बरवे कुटुंबीयांबद्दल व्यर्थ नापसंतीचे उद्गारही काढण्याची फॅशनच आली. पण ज्या मूळ डायऱ्यांवरून अख्खं एक मराठी पुस्तक झालं होतं, तेही मध्यंतरी 'आउट ऑफ प्रिंट' होतं! मराठी पुस्तकाला 'पुस्तकरूप' देताना बरवे यांच्या डायऱ्यांचं ललित अंगानं सादरीकरण झालं आहे आणि ते टाळायला हवंच, असं ज्यांनी बरवे यांच्या डायऱ्या पाहिल्या होत्या, अशा काही जणांचं मत होतं. या मताला आता शांता गोखले यांनीही दुजोरा दिलेला आहे.

बरवे यांचा चित्रविचार म्हणजे काय, असा प्रश्न मराठीतही अनेकांना पडेल. चराचराबद्दल (म्हणजे उदाहरणार्थ- सजीव मेंढी, ढग, डोंगर, वाळकी पानं अशा नैसर्गिक 'वस्तू' आणि लोणच्याची बरणी, इमारत, घड्याळ अशा मानवनिर्मित वस्तू यांबद्दल) समभावनेनं विचार करण्याची रीत बरवे यांच्या चित्रांनी रुळवली. वस्तूबद्दलच्या व्यक्तिगत भावना चित्रकाराकडे असू शकतात, पण त्या भावना चित्रात आल्यानंतर मात्र निव्वळ व्यक्तिगत असू शकत नाहीत. व्यक्तिगत अवकाश (स्वतःचं भावविश्व आणि बाहेरच्या जगाचा विचार करण्याच्या पद्धती यांचा मिळून बनलेला) आणि चित्रावकाश (चित्रकलेची तांत्रिक अंगं आणि चित्रकलेच्या इतिहासाचं आणि त्यातून आलेल्या कलाविचाराचं साद्यंतरूप या तिन्हीच्या संचितात भर घालू इच्छिणारा कोरा कॅनव्हास) यांचा मेळ चित्रकार घालत असतो. तो आपण कसा घातला, हे शब्दांत सांगताना बरवे यांनी मराठी भाषेला कामाला लावलं. या ग्रथित विचारामुळे पुढल्या पिढ्यांना, भावना- संवेदना यांचा चित्राशी संबंध काय हे आपल्या मातृभाषेतून उमगलं. त्या अर्थानं मराठीला ज्ञानभाषा करण्यात बरवे यांनी वाटा उचलला. त्याखेरीज, चित्रांची भाषा आणि मुख्यतः चित्रातली मोकळी जागा (यालाही अवकाश असाच रूढ शब्द आहे; पण बरवे यांनी एक छान शब्द दिला- 'अचित्र'!) आणि या अचित्राचा चित्राशी संबंध, चित्रात जे आकार दिसू शकतात, त्यांमधून दिसणारा विचार-भावनांचा प्राधान्यक्रम, त्या आकारांना रूढ अर्थांपेक्षा मोठे- व्यापक अर्थ देण्याची बरवे यांची रीत, हे सारं चित्रामधून उरलं.

बरवे यांची चित्रभाषा कुणाहीपर्यंत पोहोचू शकली असती, पण ती महाराष्ट्रातच अधिक राहिली (अपवाद दिल्लीकर मंजुनाथ कामथचा) याचं कारण बरवे यांच्या मृत्यूनंतर बाहेर कुठे त्यांची प्रदर्शनं वगैरे झाली नाहीत. मुंबईत आत्ता भरलेलं प्रदर्शन जर अन्यत्र गेलं, किमानपक्षी दिल्लीच्या 'नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट'नं या प्रदर्शनाला दिल्ली-बेंगळुरूमध्ये स्थान दिलं, तरीही विद्यार्थिदशेपासून अखेरच्या दिवसांपर्यंतचा बरवे यांचा चित्रप्रवास त्या शहरांत उलगडेल. त्याहीपेक्षा, बरवे यांचा ग्रथित चित्रविचार कधीही- कुठेही वाचू शकण्याची सोय आजवर फक्त मराठीच भाषेत होती, ती आता स्वतःला 'जगाची ज्ञानभाषा' म्हणवणाऱ्या इंग्रजीतही झाली आहे, हे बरं झालं. या दोन कारणांमुळे, बरवे यांच्यानंतरचं अठरावं वर्ष जगाला बरवेंबद्दल अधिक सज्ञान करणारं ठरलं आहे.

*abhijit.tamhane@expressindia.com*

## लोकमानस

*pratikriya@expressindia.com / loksatta@expressindia.com*

### उपदेश करणे सोपे आहे

**'लोकमानस'मधले** देवयानी पवार यांचे पत्र (२९ नोव्हें.) तहलकाप्रकरणी महत्त्वाचे आणि चर्चा करण्याजोगे आहे. 'गोवा पोलीस सावधानता दाखवत आहेत' हे पवार यांचे विधान मात्र समजले नाही. इथे कोणाच्या अटकेचा प्रश्न नाही. संशय असलेल्या व्यक्तीला पोलीस अधिकारी चौकशीच्या निमित्ताने कधीही बोलावू शकतात. पण आर्थिक स्तर कमी असणाऱ्या समाजातल्या संशयित गुन्हेगारांबाबतचे हे पोलिसांचे धोरण प्रसिद्ध व्यक्तींबाबत अवलंबिले जाताना दिसत नाही.

माध्यमप्रमुखांना देवयानी पवारांनी जो उपदेश केला आहे त्याबद्दल दोन शब्द सांगायला पाहिजेत. एकतर सर्व क्षेत्रांत हे प्रकार घडतात. खासगी कंपन्या आणि संस्थांहून प्रसार माध्यमे वेगळी आहेत असा विचार करणे आपण आता सोडले पाहिजे. सत्तास्थाने तर प्रत्येक संस्थांत आहेत.

आपले कोणीही काही करू शकत नाही असे सत्तेवर असलेल्यांना वाटते हे खरे आहे. पण त्याचबरोबर त्यांचे कोणीही काही करू शकत नाही हेही खरे आहे. आपण हे अनेक वर्षे पाहत आलो आहोत. एखादा सापडतो. त्यालाही शिक्षा होते की नाही आणि ती कधी होते हा मुद्दा अलाहिदा. तेव्हा कोणीही काहीही करू शकत नाही हा उच्चपदस्थांचा भ्रम नसून ते वास्तव आहे. महिलांनी पुढे येऊन तक्रार करावी हे म्हणणे सोपे आहे. पण यात अनेक गुंते असतात. आर्थिक आणि मानसिक, सामाजिक अशी अनेक प्रकारची दडपणे असतात. आपण मालकाच्या मर्जीतून उतरू, आपली बदली होईल या भीतीने कार्यालयातला स्टाफ नेहमी मालकाच्या बाजूने साक्ष देतो आणि पीडित महिलेला एकाकी पाडतो. तहलकाप्रकरणी ज्यांनी राजीनामा दिला त्या पत्रकार स्त्रियांइतक्या समाजातल्या सर्व स्त्रिया सुस्थितीत नसतात. अशी कितीतरी प्रकरणे आसपास पाहायला, अनुभवायला मिळतात; ज्यात व्यवस्था गुन्हेगाराच्या बाजूने उभी राहिली आहे. खटले जेव्हा उभे राहतात तेव्हा त्या 'स्त्रीचा यात दोष नसेलच कशावरून' अशी कुजबुज समाजात चालते. खटला जसा लांबेल तशी कुजबुज वाढत जाते आणि घटना समाजाच्या करमणुकीचा विषय होऊन बसते. एकूण सारे प्रकरण आपल्याला वाटते इतके सोपे नाही. उपदेश करणे त्यामानाने सोपे आहे.

**–अवधूत परळकर,** माहीम

### पाप कशाला म्हणायचं?

**सर्वोच्च न्यायालयानं** 'सहजीवन हे पाप किंवा गुन्हा नाही' असं सांगितल्याची बातमी (२९ नोव्हें.) वाचली. शारीरिक आकर्षणापोटी लग्नबंधनाशिवाय सहजीवन चालू करायचं आणि मग आपापल्या आवडीनिवडी जोपासण्यासाठी पुरुषानं दुसऱ्या स्त्रीशी संग करायचा, तो त्याचा जन्मजात हक्क असल्यासारखा, हे पाप नाही का? तसंच स्त्रीनंही त्या पुरुषाकडून काही खास 'अपेक्षा' पूर्ण झाल्या आणि इतर आर्थिक/ वैचारिक बाबीत मतभेद झाले की दुसरा घरोबा करण्याचं टोकाचं पाऊल उचलणं, प्रसंगी त्यासाठी सहजीवनात उपभोगलेल्या क्षणांना बलात्काराचं रूप देणं हे पाप नाही का? अशा अल्पजीवी सहजीवनातून जन्मलेल्या अपत्यांना आश्वस्त नातेसंबंधांना पारखं करणं हे पाप नाही का? थोडक्यात, सहजीवन आणि स्वैराचार यातल्या सीमारेषा पुसट व्हायला लागल्या तर आपल्याकडची त्यातल्या त्यात सुरक्षित कुटुंबपद्धती धोक्यात येणार नाही का? सहजीवनातल्या जोडीदारांचा भावनांचा गुंता सोडवणं आणि स्वैराचाराला आळा घालणं हे लग्नसंस्थेशिवाय कुठला कायदा प्रभावीपणे करू शकेल, हा प्रश्नच आहे.

**– श्रीपाद पु. कुलकर्णी,** पुणे

### पुणे स्टेशनवरचा कुंभमेळा

**आम्ही दोघे** गेल्या महिन्यात सोलापूरहून इंद्रायणी एक्स्प्रेसने पुण्यास आलो. प्रवास व्यवस्थित झाला. संध्याकाळी सहाच्या सुमाराला पुण्यात आलो. गाडीतून उतरल्यावर तीन नंबरच्या प्लॅटफॉर्मवरून स्टेशनच्या बाहेर पडण्यासाठी पुलावरून एक नंबरच्या प्लॅटफॉर्मकडे येणे भाग होते. जवळची लहानशी चाकावरची बॅग व एक पिशवी असे सामान घेऊन आम्ही उतरणीवरून (रॅम्प) पुलावर चढू लागलो. गर्दी जरा जास्त होती. आम्ही थोडा वेळ तीन नंबरच्या प्लॅटफॉर्मवरच थांबायला हवे होते असे नंतर वाटले. पुलावर चढून गेल्यावर तर माणसांचा भयानक गठ्ठा झाला. विविध दिशांनी आलेले लोक एकमेकांना भिडून कुणालाही कुठेच जाता येईना. त्यातच काही लोक गाडी पकडायला जाण्याचा प्रयत्न करीत होते. माझ्याजवळच्या एका बाईने तिच्या पाच-सहा वर्षे वयाच्या मुलाचा हात धरला होता, तो सुटला व गर्दीत तो मुलगा दिसेनासा झाला. ती बिचारी पुनःपुन्हा हात उंचावून त्याला हाका मारीत होती. एक खाकी कपड्यातला पोलीस व्यवस्था लावण्यासाठी येत होता. त्यालाही पुढे येता येत नव्हते. तो तिथे विनोदी दिसत होता, कारण नुसते हातवारे करीत होता. सगळे जण आपापल्या पिशव्या सांभाळत एकमेकांना खेटून उभे होते. अखेर एकमेकांना जरा ढकलत, कशी तरी वाट काढत आम्ही एक नंबर प्लॅटफॉर्मच्या दिशेने सरकलो. एकाच वेळी विनोदी व भयावह असा तो अनुभव होता. पाच सात मिनिटे आम्ही कुंभमेळ्याच्या गर्दीचा अनुभव घेतला. नंतर काही लोकांची गाडी पुणे



स्टेशनवरील गर्दीमुळे चुकली, तर कुणाचा चष्मा त्या गर्दीत पडून फुटला, असे समजले. स्टेशनवरील माझ्याजवळच्या बाईला तिचा मुलगा सापडला असेल असे मी समजते. कारण तो अगदी लहान नव्हता, बोलू शकत होता.

पुणे स्टेशनवर एकच पूल अनेक प्लॅटफॉर्मना जोडतो. गर्दीच्या वेळी तिथे भयावह स्थिती असते. असा अनेक प्लॅटफॉर्मना जोडणारा निदान आणखी एक तरी पूल अत्यावश्यक आहे, हे रेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात येत नाही का? की कुंभमेळ्यात होतात तशी एखादी भयंकर दुर्घटना झाली, तरच त्यांना हे पटेल?

**–मंगला नारळीकर,** पुणे

### खटला कुठेही चालवल्याने काय फरक पडणार?

**तरुण तेजपाल** याने अटकेपूर्वी जो थयथयाट चालवला होता तो निश्चितच पत्रकार म्हणून घेणाऱ्याला शोभत नाही. त्याने गोवा पोलिसांवर केलेले आरोप, शनिवारपर्यंत गोव्याला येणे शक्य नाही असे मस्तवालपणे पोलिसांना कळवणे, खटला गोव्यात नको तर गोव्याबाहेर (म्हणजेच काँग्रेसशासित राज्यात?) चालवण्याची मागणी करणे आणि त्याचे हे वर्तन बघून न्यायालयाने त्याला देश न सोडण्याचे दिलेले आदेश ही खरे तर लाजिरवाणी गोष्ट आहे. त्यामुळे त्यावरचे जे गंभीर आरोप झाले आहेत त्याला अधिक पुष्टीच मिळत आहे. जर तुम्ही निर्दोष आहात तर घाबरायचे काय कारण?

खटला कुठेही चालवला तरी काय फरक पडणार आहे? सरकारने जर त्याची ही मागणी मान्य केली तर लोकांचा सरकारवरचा उरलासुरला विश्वासही उडेल. कारण हा दंगलीचा किंवा खोट्या चकमकीचा प्रश्न नाही, तर बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्याचा प्रश्न आहे. हे असे सभ्यतेचा बुरखा पांघरून घेऊन बसलेले नराधम जर मोकाट सुटले तर आधीच असुरक्षित असलेल्या स्त्रिया अधिकच असुरक्षित होतील. सरकारने त्या पीडित महिलेला न्याय मिळवून द्यावा आणि महिलांच्या सुरक्षेबाबत कटिबद्ध असावे हीच अपेक्षा आहे.

**– अनिरुद्ध गणेश बर्वे,** कल्याण (प.)



### भाजपला खूश करण्यासाठी?

**'करुण निस्तेजपाल'** हा अग्रलेख (२९ नोव्हे.) वाचून डोळ्याचे आणि बुद्धीचे पारणे फिटल्यासारखे झाले. अत्यंत परखड, अभ्यासपूर्ण व खूप मेहनत घेऊन केलेल्या लिखाणाबद्दल अभिनंदन! खरे म्हणजे असल्या बौद्धिक चिरफाडीची वाट असंख्य वाचक पाहत होते, ती पूर्ण झाली. एक गोष्ट मुद्दाम उल्लेख करावी अशी आहे. ती म्हणजे हा अग्रलेख भाजपला खूश करण्यासाठी तर लिहिला नाही ना, अशी शंका काहींच्या डोक्यात गोंधळ घालेल हे नक्की. पण जे काही मांडले आहे ते कोणालाही खोडून काढता येईल असे वाटत नाही. तेजपालबरोबरच 'महानगर'कर यांचाही हिशेब चुकता केला एवढे म्हणून थांबता येणार नाही.

अग्रलेखाच्या शेवटी सर्वच संस्था आपल्या नियत कर्तव्यापासून दूर जात आहेत हे लक्षात आणून दिले, तेही बरोबर आहे. त्यातून संबंधितांनी बोध घ्यावा. कारण ते समाजहितासाठी आवश्यक आहे.

**– श्रीनिवास जोशी,** डोंबिवली (पूर्व)

### तो उल्लेख कवित्वाबद्दल

**'व्यापिले जल**–भूमी-आकाश' या पत्रातील प्रा. यशवंत वालावलकर यांचे म्हणणे ग्राह्य धरायला हरकत नसावी. ह. भ. प. सोनोपंत दांडेकर आणि मुंबई विद्यापीठ (केळकर-मंगरूळकर) या प्रतींमधले त्या ओवीचे अर्थ अगदी निरनिराळे आहेत. स्तंभातील लेखाचा उद्देश बघता ज्ञानेश्वरांना कामिनीच्या कटाक्षाचे कवित्व परिचित होते, एवढेच सांगायचे होते.

**– रविन थत्ते**

## नवनीत

### आजचे महाराष्ट्रसारस्वत — २ डिसेंबर

**१८४८>** कवी, वेदान्ताचे अभ्यासक आणि मराठी व कन्नड या दोन्ही भाषांतील लेखक खंडो कृष्ण गर्दे यांचा जन्म. *विजनपुरी* हे यांचे पहिले काव्य. *श्रीगीतपंचदशी, गीतामृत-शतपदी* या काव्यांसह *सार्थ पंचदशी, लघुवासुदेव नमन* व *ब्रह्मसिद्धांतमाला* हे गद्यग्रंथ होय.

**१९०५>** आधुनिक कवी, लघुनिबंधकार, कथाकार व पत्रकार अनंत काणेकर यांचा जन्म. १९३३ मध्ये *चांदरात* या पहिल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन. 'चित्रा' आणि 'आशा' या साप्ताहिकांचे काही काळ ते संपादक होते. प्रभातच्या 'माणूस' चित्रपटाचे संवादलेखन त्यांनी केले होते. *तुटलेले तारे, उघड्या खिडक्या* हे लघुनिबंधसंग्रह, *रुपेरी वाळू* हा रूपकथांचा संग्रह, *जागत्या छाया, मोरपिसे, दिव्यावरती अंधार* आदी कथासंग्रह, *धुक्यातून लाल ताऱ्याकडे, आमची माती आमचे आकाश, निळे डोंगर तांबडी माती* ही प्रवासवर्णने गाजली. १९५७ मध्ये औरंगाबाद येथे भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

**१९११>** कथा-कादंबरीकार, ललित निबंधलेखक अनंत वामन वर्टी यांचा जन्म. *दंतकथा, अखेरचा आघात, गडगडाट* आदी १३ कथासंग्रह प्रसिद्ध. *अभिनय, नवाधर्म,* यांसारख्या त्यांच्या कादंबऱ्या वाचकप्रिय ठरल्या.

**– संजय वझरेकर**

## वॉर अँड पीस

### डिमेन्शिया : गांभीर्याने घ्यावयाचा आजार (भाग-२)

**डिमेन्शिया या** विकाराची तुलना पार्किन्सन्स, अल्झायमर जबरदस्त स्मृतिभ्रंश, म्हातारचळ अशा विकारांशी केली जाते. तुमचा-आमचा सर्वांचा मेंदू आकाराने खूप छोटा असला तरी आपल्या ७०-८० वर्षांच्या आयुष्यातील खूप खूप लहानसहान आठवणी, तपशिलासह, फ्रॅक्शन ऑफ सेकंदमध्ये सांगू शकतो. या उलट हाच 'हेल्दी मेंदू' दर क्षणाला अनावश्यक अशा लक्षावधी मुद्द्यांकडे दुर्लक्ष करून एकाच मुद्द्यावर ठाम राहून सर्वोत्तम बौद्धिक क्षमता दाखवू शकतो. मेंदू सदैव तरुण असतो. तो सहसा गंजत नाही.

डिमेन्शिया या लॅटिन शब्दाचा अर्थ अलग होणे, मनापासून अलग होणे असा आहे. तुमचे-आमचे दागदागिने, बँक बॅलन्स, जमीनजुमला, घरदार, शेती ही खरी संपत्ती नव्हे. मेंदूचे कार्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे. ही संपत्ती कमी झाली की माणसं तास-अर्धा तासापूर्वी घेतलेला चहा-जेवण विसरतात व आसपासच्या मंडळींना दोष देतात. त्यांना काळ, वेळ याचे भान राहात नाही. तारतम्य नसते. इतरांच्या भावनांचा विचार, बौद्धिक क्षमता संपलेली असते. जवळच्या नातलगांनी स्वतःचा संयम न सोडता डिमेन्शियाग्रस्त मंडळींना सांभाळून घ्यायला लागते. अशा रुग्णांना माणसात ठेवून त्यांच्या जीवनातील काही उत्तम कार्याबद्दल सकारात्मक चर्चा करून थोडा आत्मविश्वास निर्माण करायला लागतो. थोडक्यात सांगायचे झाले तर त्यांना युक्तीने घोड्यावर बसवावे लागते. त्यांना नाकारून, टाळून, त्यांची निंदानालस्ती करून चारचौघांत पाणउतारा करून चालत नाही. अशा माणसांच्या दैवात असले तर जवळच्यांच्या प्रयत्नवादाच्या मदतीने बौद्धिक क्षमता पूर्णपणे संपलेली माणसे पुन्हा नव्याने सक्षम झालेली उदाहरणे अल्प प्रमाणात का होईना, पण आहेत. ब्राह्मीवटी मोठ्या प्रमाणात, सारस्वतारिष्ट, ब्राह्मीघृत, सुवर्णमाक्षिकादिवटी, पंचगव्यघृत या औषधांबरोबर अणुतेलाचे नस्य, शिरोबस्ती, शिरोधारा यांचा युक्तीने वापर तज्ज्ञांच्या सल्ल्याने करावा. क्षमस्व.

**– वैद्य प. य. वैद्य खडीवाले**

## कुतूहल

### कृषी कर्मयोगी

**सोलापूर जिल्ह्यातील** अनगर गावातील दादासाहेब बोडके हे एक कर्तबगार शेतकरी. दादा अल्पशिक्षित असले तरी शेतीच्या विद्यापीठात पीएच.डी. शोभतील असे त्यांचे कर्तृत्व आहे. त्यांनी आपल्या शेतीत असंख्य प्रयोग केले. अनेक पिकांची लागवड केली. शेडनेट, पॉलीहाऊस आदी तंत्रे आत्मसात केली. अत्यंत सामान्य स्थितीतल्या या शेतकऱ्याने आपल्या



कष्ट व ज्ञानाच्या बळावर पुणे-हैदराबाद रस्त्याला लागून वडवळच्या शिवारात दहा हेक्टर शेती घेऊन ती बारमाही बनवली. त्यांच्या या अद्ययावत शेतात दररोज १५० मजुरांना रोजगार मिळतो. दररोज २०० ते ५०० शेतकरी शेती पाहाण्यासाठी व रोपे घेण्यासाठी भेटी देतात.

दादांनी शेवग्याच्या काही वाणांवर तीन वर्षे अभ्यास करून झाडानुसार शेंगा किती, हंगाम किती, वजन किती या सर्व नोंदी विद्यापीठ संशोधकाप्रमाणे अद्ययावत ठेवल्या. वापरलेल्या सर्व वाणांत पीकेएम-१ हे शेवग्याचे वाण पुढे सर्वश्रेष्ठ ठरले. दादा हे निरीक्षण व अभ्यासातही पुढे असत. तैवान पपईच्या बीवर काम करून त्यांनी महाराष्ट्र, गुजरात, झारखंड या राज्यांत त्याचा प्रसार केला. भारतातील हे काम पाहून तैवानच्या नोन यू कंपनीने जागतिक पातळीवरचा बी विक्रीचा पुरस्कार बोडके यांना त्यांच्या गावी अनगरला येऊन दिला. दादा बोडके यांच्या रोपवाटिकेची वार्षिक उलाढाल सध्या दीड कोटी रुपये इतकी आहे.

रोपवाटिका व रोप विक्रीवर जरी त्यांचा भर असला तरी शेती क्षेत्रात ते अनेक नवे प्रयोग करत असतात. भारतभर प्रवास करून विद्यापीठांतील नामांकित, दर्जेदार व प्रसिद्ध वाण ते आणतात आणि सोलापूरच्या हवामानात ते कसे येतात, हे अभ्यासतात. त्यांचे क्रांतिकारक व यशस्वी प्रयोग म्हणजे स्वतंत्र शेवगा शेती, जी राज्यभर गेली २५ वर्षे होत आहे. त्याचे मूळ काम दादांनी केले. बोर कलमी करण्याबरोबर दादांनी 'चेस्टनट बोर' नावाची नवी जात आणली व त्याची बाग करून या वाणाची बोरे निर्यात केली. वडवळ फार्मवरील त्यांची द्राक्षांची बाग ही आदर्श द्राक्षबागच आहे.

**– शुभदा वक्टे**

मराठी विज्ञान परिषद,
वि. ना. पुरव मार्ग, चुनाभट्टी, मुंबई २२
*office@mavipamumbai.org*

## जे देखे रवी…

### वयोमान

**तुम्ही किती** जगता हे तुमच्या जनुकांवर ठरते हे सत्य असले तरी अर्ध सत्यही आहे. गेल्या शतकाच्या पूर्वार्धात आणि आधी साथीच्या रोगांचे प्रमाण इतके प्रचंड होते की, खूप टिकाऊ जनुके मान टाकत असत. बदललेल्या जमान्यात आता वयोमानाबद्दलचे जनुकांचे सत्य उघड झाले आहे. त्यातून काही ज्येष्ठ नागरिक मी कसा ठणठणीत आहे, असे म्हणतात आणि जेव्हा त्यातले श्रेय जनुकांना देत नाहीत, तेव्हा त्यांना गर्विष्ठ समजावे. शरीरातल्या व्याधी अनुवंशिकता आणि सवयी यावर ठरते. सर्वात महत्त्वाची आणि चांगली सवय म्हणजे दोन घास कमी खाणे ही आहे. हे दोन घास म्हणजे काय हे प्रत्येकाला कळते, पण वळत नाही. वय वाढते तसे उष्मांक *(calories)* कमी लागतात. पण आयुष्यात धावपळ कमी असल्यामुळे जेवण हा एक महत्त्वाचा कार्यक्रम ठरतो आणि आपले भावनिक पोषण कमी होत आहे, अशा खोलवर दडलेल्या समजुतीमुळे खाण्यातून ही कमतरता पुरी करण्याची कृती वाढते. कमी खाणारे लोक जास्त जगतात आणि निरोगी असतात हे आता सर्वमान्य आहे. कंटाळा ही गोष्ट म्हातारपणाचे आणखी एक लक्षण. पुरुषांमध्ये जास्त बायकांमध्ये कमी. त्या काहीतरी करीत राहतात. जेवढा अहंकारी पुरुष तेवढा कंटाळा जास्त असतो. कारण पुरुष सत्तेवर पोसले जातात. हतबलता आल्यावर जगाचा द्वेष वाढतो. तेव्हा जे लोक चाळिशीच्या आसपास असतील त्यांनी तयारी सुरू केलेली बरी. काहीतरी नाद आतापासूनच लावून घ्या. नाद या शब्दात आल्हाद देणारी पुनरुक्ती दडलेली आहे. या नादात जग मागे पडते आणि माणूस स्वयंपूर्ण होतो. कंटाळा आणणाऱ्या चार-पाच गोष्टी असतील तर सर्वात कंटाळवाणी गोष्ट आधी करावी. एकदाच करून बघा. असे वाटेल की आपण सगळ्यात उंच डोंगर चढलो आता राहिल्या त्या टेकड्या आहेत. आत्मविश्वास वाढतो. तुमचे आयुष्य निराळे आहे हा विचार टाळा. सगळ्यांच्या आयुष्यात अडचणी आलेल्या असतात त्या तुम्हाला माहीत असतात किंवा त्यांच्यावर काय बेतली असेल, असा विचार करा म्हणजे परदुःख शीतल हा अनुभव घ्या. दुर्दैवी, खडतर, अवघड चरित्र वाचा म्हणजे तुमच्या सुदैवाचा अनुभव येईल.

स्वतःबद्दल कमी बोला, दुसऱ्यांचे ऐका, त्याच्यात समरस व्हा. त्यामुळे तुम्हाला जगात स्थान मिळेल आणि एकलकोंडेपणा कमी होईल. आदल्या रात्रीच उद्याचा कार्यक्रम ठरवा म्हणजे सकाळी उठल्यावर आता काय असे वाटणार नाही. वेळ असेल तर स्वतःचे कपडे धुवा, स्वतःचे ताट उचलून ठेवा, कपबशी विसळून पालथी करा. मधूनमधून कपड्यांना इस्त्री करा. काही तरी करीत राहा, वाचा, रोजनिशी लिहा. ती दुसऱ्यांना वाचून दाखवू नका. मी माझाच नियम मोडून माझ्या रोजनिशीबद्दल उद्या लिहिणार आहे. आधीच क्षमा मागतो.

**– रविन मायदेव थत्ते** *rlthatte@gmail.com*